# महाराष्ट्र विधानपरिषद
## पत्रक भाग दोन
### सोमवार, दिनांक २४ जानेवारी, २०२२ / ४ माघ, १९४३ शके

७. सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक ६ जानेवारी, २०२२ रोजीच्या बैठकीत दिलेल्या निदेशानुसार म.वि.प. नियम १०१ अन्वये लक्षवेधी सूचना, म.वि.प. नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव व म.वि.प. नियम २६० अन्वये देण्यात येणारे सत्तारूढ व विरोधी पक्षाचा प्रस्ताव स्वीकारण्याबाबचे निकष पुढीलप्रमाणे निर्गमित करण्यात येत आहे :-

(१) महाराष्ट्र विधानपरिषदेच्या आगामी अधिवेशनासाठी महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अन्वये द्यावयाच्या लक्षवेधी सूचनेचा विषय हा निकडीचा, सार्वजनिक महत्वाचा, स्पष्ट, मुद्देसूद व एकाच विभागाशी संबंधित असणे आवश्यक आहे. तसेच सदर लक्षवेधी सूचनेचे प्रारूप १५० ते १७५ शब्दांचे असावे. लक्षवेधी सूचना संपूर्णत: ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येत असल्याने १७५ पेक्षा जास्त शब्दांचे प्रारूप असलेल्या सूचना (MOIS) या संगणक प्रणालीवर स्वीकारल्या जाणार नाहीत. तसेच ऑफलाईन पध्दतीने दिलेल्या लक्षवेधी सूचना ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

(२) महाराष्ट्र विधानपरिषद नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव व नियम २६० अन्वये देण्यात यावयाच्या प्रस्तावामध्ये केवळ चार-पाच विभागांशी संबंधित विषय किंवा चार-पाच विषय समाविष्ट असावेत. त्यापेक्षा जास्त विषय किंवा विभागांशी संबंधित विषय सदरहू प्रस्तावाच्या सूचनेमध्ये समाविष्ट असल्यास अशा प्रस्तावाच्या सूचनेचा विधानपरिषदेच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात समावेश केला जाणार नाही.

(३) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिलेल्या उपरोक्त निदेशांचे पालन होण्याच्या दृष्टीने सर्व सन्माननीय विधानपरिषद सदस्यांनी खबरदारी घ्यावी. सदरहू निदेशांच्या अनुषंगाने लक्षवेधी सूचना, म.वि.प. नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव व नियम २६० अन्वये सत्तारूढ व विरोधी पक्षाचा प्रस्ताव स्वीकृती संबंधी व स्वीकृत सूचना चर्चेला घेण्यासंबंधीचा संपूर्ण अधिकार हा मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचाच राहील. याची कृपया नोंद घेण्यात यावी.

**विधान भवन,**
मुंबई
दिनांक : २४ जानेवारी, २०२२

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव
महाराष्ट्र विधानपरिषद

**<u>याची प्रत</u> :**

(१) महाराष्ट्र विधानरिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य
(२) मा.सभापती व मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव/खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
(३) मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
(४) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष
(५) मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
(६) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालय
(७) मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
(८) संगणक कक्ष **(WEBSITE)**
(९) एम.के.सी.एल कक्ष **(MKCL)**